122

ISSN 2230-7745

# समाजशास्त्र संशोधन पत्रिका

## मराठी समाजशास्त्र परिषद

वर्ष ३८ वे अंक २५ वा डिसेंबर, २०२०.

मराठी समाजशास्त्र परिषदेचे मुखपत्र

ISSN 2230-7745

# समाजशास्त्र संशोधन पत्रिका

## मराठी समाजशास्त्र परिषदेचे मुखपत्र

वर्ष ३८ वे अंक २५ वा डिसेंबर २०२०

**संपादक :— डॉ. नारायण कांबळे**

**कार्यकारी संपादक :— डॉ. राहुल भगत**

**सहायक संपादक :— प्रा. प्रियदर्शन भवरे**

**संपादक समिती सदस्य :—**

डॉ. वेदप्रकाश मलवाडे, डॉ. बळीराम पवार, डॉ. प्रदीप गजभिये,
प्रा. प्रशांत सोनवाणे, डॉ. स्निग्धा कांबळे, डॉ. शिवाजी उकरंडे
डॉ. संजय कोळेकर, प्रा. नवनाथ शिंदे, डॉ. श्रीराम खाडे,
डॉ. प्रवीण मोडेस्वार, डॉ. हिरालाल भोसले.

**संपादकीय सल्लागार मंडळ :—**

डॉ. उत्तम भोईटे, डॉ. पी. जी. जोगदंड,
डॉ. प्रदीप आगलावे, डॉ. स्मिता अवचार,
डॉ. सुरेश वाघमारे, डॉ. श्रुती तांबे, डॉ. जगन कराडे.

**संपर्क पत्ता :—**

अध्यक्ष, मराठी समाजशास्त्र परिषद,
द्वारा : पदवी व पदव्युत्तर समाजशास्त्र विभाग, स्वामी विवेकानंद महाविद्यालय,
शिरूर ताजबंद ता. अहमदपूर जि. लातूर ४१३५१४
website :www.mspmonline.com E-mail : marathisocio@gmail.com

टंकण व मांडणी : श्री. पवन गजलवार, नागपूर.
मुद्रीत शोधक : डॉ. शिवाजी उकरंडे, डॉ. संजय कोळेकर

**सुचना** : या अंकातील लेखकांनी व्यक्त केलेली मते ही त्या त्या लेखकांची आहेत. या मतांशी मराठी समाजशास्त्र परिषद अथवा संपादक मंडळ तसेच प्रकाशक, मुद्रक सहमत असेलच असे नाही.

**मराठी समाजशास्त्र परिषदेच्या आजीव सदस्यांना अंक विनामूल्य.**

समाजशास्त्र संशोधन पत्रिका, वर्ष ३८ वे, अंक २५ वा, डिसेंबर, २०२०.ISSN 2230-7745

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | लेखाचे शिर्षक | लेखक | पृ. क्र. |
| --- | --- | --- | --- |
| १. | जातीय हिंसाचार: एक समाजशास्त्रीय विश्लेषण | संजयकुमार कांबळे | ...१ |
| २. | आदिवासींची वर्तमान स्थिती: आव्हाने आणि उपाय | पद्माकर सहारे | ...५ |
| ३. | सामाजिक क्रांतीचे अग्रदूत: पेरियार इ. वी. रामासामी | प्रियदर्शन भवरे | ...११ |
| ४. | मराठवाडयातील अनुसूचित जातीच्या सामाजिक विकासात.... | मा. म. गायकवाड | ...१८ |
| ५. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शिक्षण विषयक विचार.... | मधुकर धुतुरे | ...१९ |
| ६. | मोबाईलचा वापर व स्त्रिया: एक स्त्रीवादी अध्ययन | धनंजय सोनटक्के | ...२१ |
| ७. | कुटुंब आणि कौटुंबिक हिंसाचार | दिपक पवार | ...२४ |
| ८. | टी. व्ही. पाहण्याच्या सवयीमुळे लहान बालकांवर....... | मंजुषा नळगीरकर | ...२७ |
| ९. | प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनामध्ये स्वयंसेवी संस्थेची भूमिका | हरिश पेटकर | ...३० |
| १०. | अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातील समाजशास्त्रीय चिंतन | हनुमंत मिसाळ | ...३३ |
| ११. | महिलांवरील वाढते अन्याय—अत्याचार | ज्योती दिघाडे | ...३७ |
| १२. | नाथजोगी भटक्या जमातींचे .............वास्तव: | गणेश बहादे | ...३९ |
| १३. | लॉकडाउन आणि कौटूंबिक हिंसाचाराची दाहकता | अंजली जोशी | ...४४ |
| १४. | लिंगभाव दृष्टिकोन व स्त्री पुरूष समानता | रमेश पाटील | ...४७ |
| १५. | भारतातील प्रदेशवाद: कारणमिमांसा व उपाययोजना | रामेश्वर मोरे | ...५१ |
| १६. | कोरोनाचा सामाजिक जिवनावर पडलेला प्रभाव: | रविंद्र विखार | ...५४ |
| १७. | खारवी समाजाची सांस्कृतिक स्थित्यंतरे | सचिन सनगरे | ...५७ |
| १८. | पश्चिम मुंबईतील महिला भिक्षेकरी समस्या | ज्योती पोटे | ...६० |
| १९. | कचरा वेचक कामगारांच्या सामाजिक समस्या | कैलाश अंबुलगेकर | ...६३ |
| २०. | नागरी कुटुंबाचे बदलते स्वरूप | किशोर राऊत | ...६७ |
| २१. | स्त्रीभ्रूण हत्या: एक ज्वलंत सामाजिक समस्या | रामराव चव्हाण | ...६९ |
| २२. | स्त्री कायद्यामागचं वास्तव: .......... | अंजली वाठ | ...७१ |
| २३. | लैंगिक गुन्हयातील बळी स्त्रियांचा समाजशास्त्रीय......... | वायभासे एस. व्ही. | ...७३ |
| २४. | कोराना महामारीचा भारतीय समाजावरील परिणाम | विद्या खंडारे | ...७५ |
| २५. | इतर मागासवर्गातील नौकरी करणाऱ्या विवाहित स्त्रियांच्या.... | गावंडे, खंदारे | ...७७ |
| २६. | लिंगभाव आणि तृतीयपंथी: एक आकलन | विलास चव्हाण | ...७९ |
| २७. | महिलांचे आरोग्य आणि पोषण आहार विषयक वास्तव: | विनोद शेंडे | ...८२ |
| २८. | स्त्री पुरूष समानता: काळाची गरज | सुरेखा दांडगे | ...८४ |
| २९. | कोरोनाचा उच्च शिक्षणावर झालेला परिणाम | सुनंदा भद्रशेट्टे | ...८६ |

समाजशास्त्र संशोधन पत्रिका, वर्ष ३८ वे, अंक २५ वा, डिसेंबर, २०२०.ISSN 2230-7745

# प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनामध्ये स्वयंसेवी संस्थेची भूमिका

**डॉ. एच. यू. पेटकर**, समाजशास्त्र विभाग प्रमुख, कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, चिखलदरा. जिल्हा अमरावती.

***सारांशः–*** *प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाची व्यथा आणि त्यांच्याकरीता स्वयंसेवी संस्थेचे सतत, अविरत प्रयत्न खोज नावाच्या स्वयंसेवी संस्थेनी केले आहे. 'खोज' या स्वयंसेवी संस्थेची स्थापना १९९७ ला औपचारीक पणे झालेली असली तरी या पूर्विच साधारणतः २ ते ३ वर्षापासूनच पाच सहा मित्रांनी मेळघाट मध्ये येवून अभ्यास करायला, लोकांचे प्रश्न समजावून घ्यायला मदत केली होती. काही प्रश्नाच्या संदर्भातला आवाज शासण दरबारी पोहचवायला लागले होते. आज 'खोज' या स्वयंसेवी संस्थेच्या माध्यमातून ४० गावात प्रत्यक्ष काम सुरू आहे. ही संस्था शिक्षण, बालकांचे हक्क, आरोग्य, जल, जंगल जमिन या विषयांवर काम करते. मेळघाटच्या सर्वच लोकांच्या सामुहिक प्रश्नांसंदर्भात कलेक्टर ला भेटून माहिती देवून त्यातून मार्ग काढण्याकरीता प्रयत्नरत रहातात. शासन व शासकीय कर्मचारी जर ऐकून घ्यायलाच तयार नसतील, समजून घ्यायला तयार नसतील तर अशा वळी जनसामान्यांना एकत्रीत करून त्यांच्या हक्कांकरीता संघटीत करून मोर्चा काढणे व शासण दरबारी दाद मागण्याचे कार्य या संस्थेनी केलेले आहे, करत आहे. या संस्थेच्या प्रकल्पग्रस्तांच्या संदर्भात केलेल्या कार्याचा आढावा प्रस्तुत शोधनिबंधात घेण्याचा प्रयत्न केला आहे. मुख्य शब्दः प्रकल्पग्रस्त. विस्थापन, पुनर्वसन. स्वंयसेवी संस्था.*

**प्रस्तावना**:– मणुष्यप्राणी हा सातत्यानी 'विकास' या विचारप्रक्रियेत असतो. मानवाने आपल्या बुध्दिचातुर्याने सर्वच क्षेत्रात नेत्रदिपक प्रगती केली आहे. यामुळेच तो समाजशिलतेसोबतच विकसनशील प्राणी ठरला आहे.स्वातंत्र्योत्तर काळानंतर भारतात विकासाची स्वप्ने मोठयाप्रमाणात बघावयास सुरूवात झाली. पाणी हेच जीवन असा विचार मूळ धरू लागला. यातूनच धरणाच्या संकल्पनेचा विचार जोर धरू लागला. स्वातंत्र्योत्तर काळात धरणे समाजविकासाची मंदिरं ठरली. यानंतरच्या काळात ४५०० मोठी धरणे उभी राहिली. धरण म्हणजे "नदीचा प्रवाहित प्रवाह विस्तृत भिंतीच्या माध्यमातून अडवून तयार केलेला जलसाठा म्हणजे धरण होय." धरणाचा इतिहास फार प्राचीन आहे. भारतामध्ये इ.स. ५०० ते १८०० या काळात दक्षिण भारतात पल्लव आणि इतर राज्यांनी मातीची धरणे बांधण्याचा उल्लेख आहे. इ.स. दुसऱ्या शताकत करीकाल या चोल राजाने बांधलेल्या कावेरी नदीवरील अनईकट्टर या दगडी बंधाऱ्यापासून आजही तंजावर जिल्हयातील हजारो हेक्टर शेतीसाठी पाणी पुरविले जात आहे.

जगामध्ये मोठी धरणे असणाऱ्या देशामध्ये भारताचा क्रमांक तिसरा आहे. या धरण प्रकल्पामुळे आजवर दोन करोडपेक्षा अधिक लोक विस्थापित झाल्याचा अंदाज असून निश्चित आकडेवारी उपलब्ध होत नाही. राष्ट्रविकास हा उद्देश धरण निर्मितीबाबत असला तरी 'धरण' म्हणजे 'विकास' एवढा मर्यादित अर्थ लक्षात घेवून अथवा गृहित धरून चालत नाही. त्यामुळेच आपल्या देशात धरणाच्या माध्यमातून होणारे विस्थापन व पुनर्वसन या संदर्भात कायदे आहेत. परंतू ते अपुरे आहेत. विस्थापणाकरीता सरकारच्या नियोजनशुन्य कार्यामुळे धरणे वादग्रस्त ठरत आहेत. धरणांमुळे अनेक सामाजिक समस्या निर्माण झाल्या आहेत. वनक्षेत्राचाऱ्हास, प्राणीतसेच पक्षी. वनस्पती यांचा ऱ्हास, भूकंप क्षेत्रात वाढ, आदिवासी लोकांचे जीवन प्रभावित होणे, कृषी क्षेत्र प्रभावित होणे, रोजगाराची समस्या निर्माण होणे त्याचप्रमाणे विस्थापणची समस्या इ. अनेक प्रश्नांना सरकारला सामोरे जावं लागतं. यातील प्रकल्पामुळे म्हणजेच धरणप्रकल्पांमुळे विस्थापणाचा प्रश्न 'आ' वासून उभा आहे. शासनास नियोजनबध्द पध्दतीने व मानविय भुमिकेतून विस्थापणाकडे मानवी दृष्टि ठेवून वागण्याची आवश्यकता आहे.

विस्थापन म्हणजे नेमकं काय? तर "विस्थापन म्हणजे शासकीय किंवा शासनमान्य खाजगी प्रकल्पामुळे मूळ भूभागावरून दुसरीकडे स्थलांतरीत होणे होय."तसेच पुनर्वसन म्हणजे."शासकीय किंवा शासनमाण्य खाजगी प्रकल्पामुळे विस्थापीत झालेला व्यक्ती तथा कुटूंबाना दुसऱ्या भौगोलीक क्षेत्रात नियोजनबध्द पध्दतीने बसविने होय."विस्थापनाच्या प्रक्रियेत भौगोलीक विस्थापनासोबतच या कुटूंबाचे मानसिक पुनर्वसन होणे अत्यंत गरजेचे आहे. त्याचप्रकारे यांचे आर्थिक पुनर्वसन हा अत्यंत महत्वाचा पैलू आहे जो त्यांच्या गरजेचा आहे. जो त्यांच्या जगण्याशी संबंधीत आहे. त्यावर सविस्तर व सखोल अभ्यास होणे गरजेचे आहे. शासनाच्या होणाऱ्या दिरंगाई व दुर्लक्षतेकडे लोकांनी जागरुक राहून ते करून घेण्याची गरज आहे. अशा वेळी स्वयंसेवी संस्थांची भूमिका चांगल्याप्रकारे व जबाबदार पुर्ण असेल तर गावकऱ्यांकरीता अशी संस्था वरदान ठरते.

अशाच एका प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाची व्यथा आणि त्यांच्याकरीता स्वयंसेवी संस्थेचे सतत, अविरत प्रयत्न खोज नावाच्या स्वयंसेवी संस्थेनी केले आहे. 'खोज' या स्वयंसेवी संस्थेची स्थापना १९९७ ला औपचारीक पणे झालेली असली तरी या पूर्विच साधारणतः २ ते ३ वर्षापासूनच पाच सहा मित्रांनी मेळघाट मध्ये येवून अभ्यास करायला, लोकांचे प्रश्न समजावून घ्यायला मदत केली होती. काही प्रश्नाच्या संदर्भातल आवाज शासण दरबारी पोहचवायला लागले होते. आज 'खोज' या स्वयंसेवी संस्थेच्या माध्यमातून ४० गावात प्रत्यक्ष काम सुरू आहे. ही संस्था शिक्षण, बालकांचे हक्क, आरोग्य, जल, जंगल जमिन या विषयांवर काम करते. मेळघाटच्या सर्वच लोकांच्या सामुहिक प्रश्नांसंदर्भात कलेक्टर ला भेटून माहिती देवून त्यातून मार्ग काढण्याकरीता प्रयत्नरत रहातात. शासण व शासकीय कर्मचारी जर ऐकून घ्यायलाच तयार नसतील, समजून घ्यायला तयार नसतील तर अशा वळी जनसामान्यांना एकत्रीत करून त्यांच्या हक्कांकरीता संघटीत करून मोर्चा काढणे व शासण दरबारी दाद मागण्याचे कार्य या संस्थेनी केलेले आहे, करत आहे.

'खोज'ही संस्था कागदोपत्री संस्था न रहाता खऱ्या अर्थानी मानवाच्या विकासाकरीता सहायक्क सामाजिक संस्था ठरणारी आहे. मेळघाट मधिल फारच क्वचीत लोक असे आहेत की जे खोज या स्वयंसंवी सस्थेला ओळखत नाहीत. अधिकाधिक लोकांना 'खोज' संबंधी माहिती आहे.

महाराष्ट्रातील विदर्भ आणि विदर्भातील अमरावती जिल्हा हा आदिवासी जिल्हा म्हणून ओळखला जातो. यातील मेळघाट हा शब्द आंतरराष्ट्रिय पातळीवर पोहचला आहे. मेळघाट हा परिसर म्हणजे भौगोलिक दृष्टया धारणी व चिखलदरा तालुक्यातील भूभाग होय.

२००१ ला **सापन** नदी प्रकल्प मंजूर झाला. हा मध्यम डॅम्प (एरिकेशन डिपार्डमेंटच्या नुसार) तयार करण्याच्या हालचाली सुरू झाल्या त्यावेळी दोन गाव बुडीत क्षेत्रात जाणार हे लक्षात आले. त्यातील एक जैतादेही व दुसरे वझ्झर. वझ्झर हे अचलपूर तालुक्यात येतं. तर जैतादेही हे चिखलदरा तालुक्यात वझ्झर हे पूर्णपने बुडीत क्षत्रात गेलं नाही. नदिपात्रापुढे ते गाव होतं. जैतादेही मात्र पुर्णः बुडित क्षेत्रात गेलेलं गाव आहे. या गावाची तत्कालीन लोकसंख्या ५३५ (२००१), कुटूंब सख्या ७२, शेतकरी (ज्यांच्या

कडे जमीन होती) ४५, या पंचेनाळीसही शेतकऱ्यांनी जमिन पूर्णतः बूडीत क्षेत्रात गेली होती. धामणी गावालगतच रस्त्याच्या दुसऱ्या बाजूला जैतादेही या गावाचे पुनर्वसन केले आहे. प्रती एकर ६ हजार रूपये या सरकारी भावाने जमिनीचा मोबदला शेतकऱ्यांना दिला होता. गावकऱ्यांना घराकरीता जमिनीचा भूभाग दिलेला होता. तिथे कागदोपत्री जरी अनेक सुविधा केलेल्या दाखविल्या गेल्या असल्या तरी प्रत्यक्षात मात्र अनेक त्रूटी होत्या/ आहेत. उदा. १. त्यांना रोजगार नाही. २. रोजगार हमी करीता शेती नाही. ३. जंगलापासून वंचीत झाले. ४. पारंपारीक व्यवसायापासून वंचीत झाले. ५. गावात दळणवळणाच्या साधणांचा अभाव आहे. ६. शासनाकडे २० टक्के रक्कम शेतीची ठेवूनही अजूनपर्यंत जमीन दिलेली नाही. ७. गाव प्रशासकीय दृष्टया आजही चिखलदरा तालुक्यात आहे. ८. गावाची पोलीस स्टेशन हद्द अचलपूर तालुक्यात आहे. अशी विदारक परिस्थीती आहे.

अशा परिस्थितीत 'खोज' या स्वयंसेवी संस्थेनी स्वतः पुढाकार घवून गावकऱ्यांच्या मदतीने आतापर्यन्त १५ ते १६ आंदोलनं केलीत. ही आंदोलने गावातील मुलभूत सोयींकरीता झालेली आहे. या आंदोलनामूळे गावात बोरवेल करून सार्वजनीक व वैयक्तीक नळयोजना सुरू केल्या गेली, स्मशान भुमीकडे जाण्याचा रस्ता तयार करवून घेतला, २००६ ला 'सामूहिक वनहक्क कायदा' याबाबत गावकऱ्यांना माहिती दिली. या आधारे ग्रामसभा दावा करू शकते यावर मार्गदर्शन केले.गावात ६६ हक्टर जमिन होती त्यापैकी २२ हेक्टर जमिन तलावामुळे पाण्याखाली गेली. २००६ च्या कायद्यातंर्गत पाण्याखाली जमिन गेल्यामुळे त्या पाण्यावर गावकऱ्यांना हक्क मिळाले पाहिजे, शोषण थांबले पाहिजे याकरिता संघटीत होण्याचे आव्हान केले ग्रामसभेनी सामूहिक दावा दाखल केला. यात २००६ चा CFR व PESA'सामूहिक वनहक्क व आदिवासिंचे स्वयंशासन' कायदा या अंतर्गत वनहक्क दावा दाखल करण्यात आला. हे कार्य करीत असतांना सातत्यानी काही अडचणी यायच्या. जसे– गावकऱ्यांच्या जमिनीचे क्षेत्र चिखलदरा तालुक्यात आहे. डॅम्पची भिंत किंवा कार्यक्षेत्र अचलपूर तालुक्यामध्ये येते. तलावाचे क्षेत्र १०० हेक्टरच्या वर आहे.या सर्व भौगोलीक व सामाजीक अडचणींवर मात करून 'खोज' या स्वयंसेवी संस्था व जैतादेहीचे ग्रामस्थ यांनी त्यासंदर्भात सातत्यानी पाढपुरावा केला. याकरीता केलेले कार्य म्हणजे —सातत्यानी मोर्चे काढणे. जिल्हाधिकारी यांना निवेदन दिले. आदिवासी विभागाचे प्रधानसचिव यांना गावची बाजू, मागण्या समजावून देणे. दुग्ध, मत्स्य विकास विभाग यांच्या सचिवांना समजावून सांगणे. महाराष्ट्राचे मुख्य सचिव, अमरावती आयुक्तालय विभागीय आयुक्त महसूल यांना सविस्तर सर्व बाबी समजावून सांगणे. वारंवार पाठपुरावा केला. प्रमुख मागणी ही की, ज्यांचं जगण्याचं/उपजिविकेचं साधण हरवलं आहे, त्यांना जगण्याच साधण मिळायलाच पाहिजे. पेसा कायद्यामध्ये समाविष्ट असलेल्या बाबींचा आधार घेवून दावा दाखल केला. २१ एप्रिल २०१५ चे परिशिष्टानुसार १०० हेक्टरच्या आतील, गौण, खनिजे, व इतर सांस्कृतिक / नैसर्गिक साधन संपत्तीचे व्यवस्थापन करणे.

या संदर्भाचाच उल्लेख करून जैतादेहीच्या ग्रामस्थांनी दावा केला, पण अडचण अशी की या तलावाचे क्षेत्र हे ११३ मधून २२ हेक्टर गावाची जमिन गेली ती वजाकेली तर १०० हेक्टर पेक्षा कमी भौगोलीक क्षेत्राचा तलाव शिल्लक रहातो, म्हणून जैतादेही गावाचाच येथे अधिकार आहे. हे सर्व वारंवार संबंधित अधिकारी व पदाधिकाऱ्यांना समजावून सांगितले, पटवून दिले.'सापन नदी प्रकल्प' येथे सहकारी संस्था पूर्वीपासून कार्यरत होती. या संस्थेला हा तलाव लिजवर देण्यात आलेला होता. जैतादेही या प्रकल्पग्रस्त गावाने तलावावर गावाच्या मालकीहक्कासाठी दावा दाखल केल्यावर त्यांना 'सामूहिक वनहक्क व जिल्हास्तरीय समिती' यांनी ग्रामसभेला तलावाबाबत हक्क सुपूर्द केले. सहकारी संस्था ही अशा प्रकारचा निर्णय झाल्यास कोर्टात जाणारच असे 'खोज' स्वयंसेवी संस्थागृहित धरूनच होती. म्हणूनच ग्रामस्थांच्या मदतीने पूर्वीच 'कॅव्हेट' दाखल करण्यात आला होता. (कॅव्हेट म्हणजे या संदर्भात जोही व्यक्ति कोर्टात दाद मागणार त्या संदर्भात कोर्ट पहिले पार्टिला कळवेल)

यानंतर हायकोर्टानी सहाय्यक आयुक्त मत्स्यपालन अमरावती यांना सूचना दिली की, प्रत्यक्षामध्ये पूर्वी जी सहकारी संस्था तलावावर उपजिवीका करायची त्यांना यानंतर उपजीविकेकरीता काय पर्यायी सुविधा उपलब्ध करून देता येईल.

ग्रामसभा, सहकारी संस्थेतील ३०० सभासद (नोंदणीकृत) तसेच स्वयंसेवी संस्था खोज यांची एकत्र मिटींग झाली. सहकारी संस्थेचा PESA ACT२१ एप्रिल २०१५ नुसार काही हक्क चालत नाही उलट तो पुढिल काही मुद्दयांच्या आधारे रद्दच होतो असे पटवून दिले. तसेच सहकारी संस्थेतील सभासदांच्या उपजिविकेकरीता काही उपायही सूचविले. जसे– १. तलावाला हक्क असणारी संस्था तलावापासून १० किलोमिटरच्या आतील परिसरातील असावी. २. स्थानिक लोक सभासद असावे. या दोन मुद्दयांच्या आधारावर सहकारी संस्थेकडून तलावाचा हक्क काढून घेवून जैतादेही ग्रामसभेला तलावावर उपजिवीकेचा हक्क २०१३ ला मिळाला. सहकारी संस्थेतील सभासदाच्या उपजीविकेचा दृष्टिने काही उपाय सुचविण्यात आले. — १. तलावाच्या परीसरातील लोकांचे पूर्वीचे सभासदत्व रद्द करावे जेणेकरून ते नविन श्रेणिमध्ये टाकता येईल. २. सहाकारी संस्थेतील सभासदांना त्यांच्या गावानजीक असणारे तलाव सूचविले त्यावर त्यांना हक्क मिळावा असेही सुचविले. ३. 'वासनी मध्यम प्रकल्प' येथे सहकारी संस्थेनी मत्सव्यवसाय करावा. ४. जैतादेही ग्रामस्थांकडून त्यांनी १०० रू. किलोग्रॅम या दरानी मासे विकत घ्यावी व अधिक किमतीत बाहेर त्याची विक्री करावी. परंतू त्यांना ग्रामसभेचे प्रतीनिधित्व देता येणार नाही.

**'खोज' स्वयंसेवी संस्थेनी महारष्ट्रस्तरावर स्तरावर केलेले प्रयत्न** :—१. राज्य सरकारनी महाराष्ट्रतील सहा आदिवासी जिल्हे आणि त्या सहाही जिल्हयातील प्रत्येकी सहा गावांची निवड करावी. २. निवड झालेल्या सहाही गावात, सहा जिल्हयांकरीता दोन शासणनिर्णय घेण्यात आले. ३. ग्रामसभेला सुरूवातीला भांडवल म्हणून ५०००० रू. द्यावे. ४. ग्रामसभेनी या ५०००० रू. चे काम केल्यास त्यांना पुढिल कामाकरीता २००००० रू. देण्यात यावे.

या निर्णयाअंतर्गत 'खोज' संस्थेच्या कार्यक्षेत्रातील अमरावती जिल्हयातील मेळघाट विभागातील भुलोरी, घोटा आणि जैतादेही गावाला प्रत्येकी २५०००० रू. देण्यात आले.

**जैतादेही गावाला तलावावर दावा मिळाल्यानंतर आलेल्या अडचणी व त्यातून केलेले मार्गक्रमण** —'खोज' संस्थेच्या माध्यमातून जैतादेही येथील ग्रामस्थांकरीता पेंचप्रकल्प रामटेक, महाड (अहमदगर) येथे अभ्यासदौरा आयोजीत केला. दोन दिवसीय प्रशिक्षणाचे आयोजन केले. यात त्यांना पुढिल माहिती देण्यात आली. — प्रत्यक्ष तलाव पहाणी. मासेमारी करण्याबाबत प्रशिक्षण. मासेमारी संदर्भात ग्रामसभेची कार्यपध्दती. जाळीचे प्रकार, व ती वापरण्याची पध्दती. बिज आणने आणि बिज तलावात सोडण्याची पध्दती. या सर्व पध्दती समजावून सांगण्यात आल्या. यानंतर गावात आल्यावर ग्रामस्थांनी दोन बोट आणि जाळे खरेदी केल. 'खोज' या स्वयंसेवी संस्थेकडून २०१६ ला ७० हजार रूपये बिज घेण्याकरीता देण्यात आले. हे सर्व करतांना गावकऱ्यांच्या मनात सुरूवातीला साशंकता तसेच भिती होती. तलावात जावून मासेमारी करण्याकरीत

कुणिही तयार होत नव्हते. ही कल्पनाच त्यांच्याकरीता नवी होती. मासेमारी करीता लागणारे साधणसामुग्री पुरेश्या प्रमाणात गावाकडे नव्हती त्याबाबतीतील ज्ञानही नव्हते. अशा परिस्थीतीत गावातील एक व्यक्ती पुढे आला. कुणी नसेल तरी मी हे काम करणार असा निर्धार त्यानी केला. त्याच्यापाठोपाठ चार पाच तरून व्यक्ती यांनी पुढाकार घेवून कामाला सुरूवात झाली.मासेमारी संदर्भातील संपूर्ण ज्ञान, तंत्रज्ञान ग्रामस्थांना मिळावे याकरीता खोज या स्वयंसेवी संस्थेनी अतोनात प्रयत्न केले, आजही करत आहे. पहिल्यावर्षी म्हणजे २०१३ ला शासनाकडून गावाला निधी उपलब्ध झाला नाही. दुसऱ्या वर्षी काही प्रमाणात शासणाकडून निधी प्राप्त झाला परंतु मत्स्य बीज पुरेशा प्रमाणात मिळाले नाही. तिसऱ्या वर्षी शासणाकडून निधी व मत्स्यबीज दोन्ही मिळाले. सद्य परिस्थितीत सहा प्रकारचे मासे या तलावात आहे. स्थानिक मासे बाम, बोठया व पिला तसेच इतर कतला, रोहू व मृगल अशी सहा प्रकार मास्यांचे आहेत.

**जैतादेही गावाची बदललेली स्थिती:**—गावात मासेमारीकरीता पूर्वी एक गट होता. आता गावातील लोकांना या कामावर विश्वास वाढला. आपले उदरनिर्वाहाचे साधण हे मासेमारी होवू शकतो असे त्यांना वाटायला लागले आहे.तसेच मासे विकूनही आपण उदरनिर्वाह करू असे त्यांना जाणवू लागले आहे. या विश्वासाचा परीणाम असा झाला की पुर्वी एक गट होता तर आता सहा गट आहेत, आणि भविष्यात वाढण्याची शक्यता मोठया प्रमाणात आहे.

**प्रकल्पग्रस्तांच्या अडचणी:**—१. तलावाचे भौगोलीक क्षेत्र ११२ हेक्टर आहे. त्या तुलनेत बोटींची व जाळयांची संख्या कमी आहे. २. मत्स्यबिजांची संख्याही कमी आहे. ३. तलावावर २४ तास देखरेखीची गरज आहे, याकरीता डीझेलबोट देखील आवश्यक आहे. ४. तलावाजवळच्या इतर काही गावांच्या कडून मासे चोरीला जातात हा त्रास आहे. ५. तलावातील वृक्षतोड चांगल्याप्रकारे न झाल्यामुळे तलावात पाण्याच्या आत असलेल्या झाडांच्या खोडांना अडकून जाळे फाडण्याचे प्रमाण अधिक आहे. ६. गावाजवळ पैशानी कमतरता असल्यामुळे मत्स्यबीज संख्या कमी प्रमाणात आणली जाते.

**जैतादेहीचे ग्रामस्थ आणि खोज संस्थेचे स्वप्न :**—केज फिशींग करणे. (पिंजरा). बिजांची संख्या वाढविणे. (तलावाची क्षमता ५ लाख बोटकूल्यांची आहे.) 'रेअरींग पॉन्ड' तयार करणे. (लहाण मासे मोठे करणे). व्यवसायाच्या दृष्टिने लोकांना सक्षम बनविने. (रेअरींग पॉन्ड ला खोज संस्थेच्या पुर्णिमा उपाध्याय यांच्या विदर्भ वैधानिक मंडळाच्या निधीतून ग्रामसभेला १० लाख रू. दिले आहे.)

**ग्रामसभेला प्राप्त होणारा निधी आणि त्याचा विनीयोग** :—ग्रामसभेला प्रती किलो ५० रू. याप्रमाणे रक्कम मिळते. यातून ग्रामसभेकडे जवळपास दिड लाख रू. पर्यन्त खर्च वजा जाता निधी उपलब्ध आहे. यातून ग्रामसभेत १) गावातील अंगणवाडीतील मुलांना अंडी दिली. २) बोरवेलकरीता पैसा दिले. त्यामुळे गावात घरोघरी पाणी मिळाले.

वरील सर्व विवेचणावरून असे लक्षात येते की, सरकारी स्तरावर एखादया प्रकल्पग्रस्त गावकऱ्यांचे पुणर्वसन हे केवळ कागदोपत्री दाखविल्या गेले तरीही वास्तवात मात्र त्या गावाचा कायापालट होत असतो. असाच अनुभव 'खोज' या स्वयंसेवी संस्थेच्या प्रयत्नामुळे जैतादेही या गावाला आलेला आहे. यावरून असे निदर्शनास येते की प्रकल्पग्रस्तांच्या पुणर्वसनामध्ये स्वयंसेवी संस्थांची भूमिका महत्वपूर्ण ठरते.

*संदर्भ सुची:*

१. *बोकील मिलींद, (२००९),कातकरी विकास की विस्थापण, मुंबई : मौज प्रकाशन गृह*

२. *सेलकर राम, (१९९९), महाराष्ट्र प्रकल्प बाधित व्यक्तींचे पुर्नवसन अधिनियम, औरंगाबाद : अशोक ग्रोवर अॅन्ड कंपनी, लॉ बुक सेलर्स अॅन्ड पब्लीशर्स.*

३. *शहा लिला , (२००६), नर्मदेच्या क्षितीजापार, डोंबिवली : सुमेरू प्रकाशन*

४. *संगवाई संजय, (२००७), उद्गार, मुंबई : [illegible] प्रकाशन.*

५. *तपासे पाटिल प्रदिप, (२०१०), भूमी संपादन कायदा, पुणे: सी.टी.जे. पब्लिकेशन.*

६. *आंदोलन, 'आंदोलन शास्वत विकासासाठी', प्रकाशक मेधा पाटकर, पुणे.*